महाराष्ट्र शासन
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/शै.वि-५/कार्यालयीन स्वच्छता/२०२३/ 5064 दिनांक : 31 OCT 2023

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व शासकीय संस्था.
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय, पुणे

**विषय :- संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्था/कार्यालयातील स्वच्छतेबाबत.**
**संदर्भ :-** तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र. १/कार्यालयीन स्वच्छता/२०२३/१७० दि. २३.१०.२०२३.

संचालनालयाच्या अधिपत्याखालील काही शासकीय संस्था/कार्यालयांना मागील ७-८ महिन्यांच्या कालावधीत मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी भेट दिली असता, शासकीय संस्था/कार्यालयांमध्ये नस्ती इतरत्र ठेवलेल्या, तसेच अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आले. मोठ्या प्रमाणात नस्त्या अनेक दिवस न हाताळल्यामुळे धुळीने माखलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्याचप्रमाणे इमारतीमधील व्हरांड्यात व कार्यालयामध्ये नादुरुस्त फर्निचर व इतर अडगळ दिसून आली.

त्यास अनुसरुन या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय संस्थाप्रमूखांना कळविण्यात येते की, सर्व शासकीय संस्था/कार्यालयात कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेखांचे शासकीय नियमावलीनुसार वर्गीकरण व निंदणीकरण करावे. त्याचप्रमाणे संस्था/कार्यालयातील नादुरुस्त संगणक फर्निचर इत्यादीच्या निर्लेखनाची कार्यवाही नियमानुसार तात्काळ करावी.

उपरोक्त निर्देशानुसार कालबध्द पध्दतीने कामाचे नियोजन करुन दिनांक ०८.११.२०२३ पूर्वी संबंधीत संस्था/कार्यालय प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही पूर्ण करावी व त्याचा अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास सादर करावा.

सोबत : संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०१/४६०,
ई-मेल-desk1@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महत्वाचे / इ-मेलद्वारे**

क्रमांक : १/कार्यालयीन स्वच्छता/२०२३/१७०० दिनांक : 23/10/2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर.

**विषय : संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्था / कार्यालयातील स्वच्छतेबाबत...**

संचालनालयाच्या अधिपत्याखालील काही शासकीय संस्था / कार्यालयांना मागील ७-८ महिन्यांच्या कालावधीत मी भेट दिली असता, शासकीय संस्था / कार्यालयांमध्ये नस्ती इतरत्र ठेवलेल्या, तसेच अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आले. मोठ्या प्रमाणात नस्त्या अनेक दिवस न हाताळल्यामुळे धुळीने माखलेल्या अवस्थेत आढळून आल्या. त्याचप्रमाणे इमारतीमधील व्हरांड्यात व कार्यालयामध्ये नादुरुस्त फर्निचर व इतर अडगळ दिसून आली.

या परिपत्रकान्वये संचालनालयाच्या अधिपयत्याखालील सर्व शासकीय संस्था / कार्यालयात कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्था / कार्यालयाची स्वच्छता करुन घ्यावी. तसेच कार्यालयातील अभिलेखांचे शासकीय नियमावलीनुसार वर्गीकरण व निंदणीकरण करावे. त्याचप्रमाणे संस्था / कार्यालयातील नादुरुस्त संगणक, फर्निचर इत्यादीच्या निर्लेखनाची कार्यवाही नियमानुसार तात्काळ करावी.

उपरोक्त निर्देशानुसार कालबध्द पदध्तीने कामाचे नियोजन करुन दिनांक १०/११/२०२३ पूर्वी संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही पूर्ण करावी व विभागीय सहसंचालकांनी विभागाचा एकत्रित अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. विनोद म मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१. संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतने व इतर तत्सम संस्था (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत)
२. निवडनस्ती (कार्यासन क्रमांक १)

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
26 OCT 2023
आवक क्र. 8324